# मसुदा कसा ॲड करावयाचा आहे.

1 स्टेप

लॉगीन करणे.

Add Draft वर क्लीक करणे

1) Document Title: खरेदीखत-----

2) Document Type: एकवचनी/अनेकवची (आपल्या सोयीनुसार)

3) Text One:- खरेदीखत मौजे #CITY येथील शेत जमीनीचे रजिस्ट्रेशन तुकडी व जिल्हा परिषद, #DIST पोट तुकडी व पंचायत समिती, #TALUKA,ता.#TALUKA, जि.#DIST. येथील खरेदीखताबाबत.

4) Text Two:-

रजिस्ट्रेशन तुकडी व जिल्हा परीषद #DIST पोट तुकडी व पंचायत समिती #TALUKA तालुका,मा.सह दुय्यम निबंधक,तालुका पंचायत समिती #TALUKA पैकी #PROPERTYDESC

5) Text Three:-

वरील चतु:सीमे आतील मिळकत त्यातील काष्ट,पाषाण,धोंडा,पाला पाचोळा,झाड झाडोरा,निधिनिक्षेप इत्यादी सर्व तदंगभुत वस्तुसाहित तसेच जाणे येण्याचे रस्त्याचे निरंतर वहिवाटीचे व वापराचे,वागणुकीचे सर्व हक्कासह मिळकत विक्री केली आहे. वरील वर्णन केलेली मिळकत लिहुन देणार यांच्या मालकीची असुन त्यांचे नावाची नोंद 7/12 वर असुन लिहुन देणार यांचे नावे मालक कब्जेदार म्हणुन दाखल आहे.त्यावर लिहुन देणार यांचे व्यतिरीक्त इतर कोणाचा कसल्याही प्रकारचा मालकी हक्क वा आधिकार नाही.त्यामुळे सदरची मिळकतीचा उपभोग घेण्याचा व विल्हेवाट लावण्याचा हस्तांतर करण्याचा लिहुन देणार यांना एकमेव हक्क व आधिकार आहे. वरील वर्णन केलेली मिळकत लिहुन देणार यांनी #REASON विक्री केली आहे.

लिहुन देणार असे नमुद करतात की वर वर्णन केलेली मिळकत पुर्णपणे निर्वेध,निर्जोखमी व बोजारहित असून सदरील मिळकत कोणत्याही कोर्टात दाव्याचा विषय म्हणून दाखल नाही. अथवा जप्त किंवा ऍटॅच झालेली नाही. व ती एक्वायर झालेली नसून सदर मिळकतीवर कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, लिन, लीज, पोटगी, अन्न, वस्त्र, बक्षीस, अदलाबदल, मृत्युपत्र, वारसाहक्क, वाटपकोर्ट, वाद अतिक्रमण, खरेदीखत, ताबा, साठेकरार,

कुलमुखत्यारपत्र, अगर तत्सम स्वरुपाचा बोजा नव्हता व नाही. निघाल्यास/असल्यास ते कर्ज लिहुन देणार परतफेड करतील.

त्याचप्रमाणे सदरची मिळकत कोठेही ऍक्वायर,रिक्वायर अगर रिझर्व्ह होणेबाबत आम्हांस नोटीस आलेली नाही.व सदर मिळकतीला मार्केटेबल टायटल असुन लिहुन देणार यांचे मालकी हक्काबाबत व मार्केटेबल टायटल बाबत लिहुन घेणार यांनी खात्री करुन घेतलेली आहे.व प्रत्यक्ष लिहुन देणार यांनी लिहुन घेणार यांचे ताब्यात मालकी हक्काने दिली आहे. व ती परत घेण्याबाबत कोणताही लेखी वा तोंडी करार केलेला नाही. आता ह्या खरेदीखताने लिहुन घेणार हे सदर मिळकतीचे पुर्णपणे मालक झाला आहात. तरी खरेदीदार मालक म्हणुन तुम्ही तुमचे पुत्र पौत्रादी,वंशपरंपरा, निरंतरपणे मालकी हक्काने वाहिवाट करावी उपभोग घ्यावा अथवा विल्हेवाट लावावी.

सदरचा खरेदीखताचा दस्त लिहुन देणार व त्यांचे वाली वारसांवर संपुर्णत: बंधनकारक आहे. तुमचे मालकी हक्कास, वाहिवाटीस व उपभोग घेण्यास लिहुन देणार यांचे भाऊ,भाऊबंद,वालीवारस,सावसावकार इ.कोणीही कसल्याही प्रकारची हिल्ला हरकत करणार नाही व तसे कोणी केल्यास त्याचे निवारण करण्याची सर्वस्वी जबाबदारी लिहुन देणार यांच्यावर राहील. त्याची कोणतीही तोषीस लिहुन घेणार यांना लागु देणार नाही. सदर मिळकतीचे महसुल दप्तरी व इतर दप्तरी लिहुन घेणार यांनी आपले नावाची मालक म्हणुन नोंद करुन घ्यावी त्याकामी लिहुन देणार यांची सही संमती लागल्यास समक्ष हजर राहुन अर्ज,जाब जबाब, सही संमती विनामोबदला देवुन लिहुन घेणार यांचे नावावर करुन देतील.

त्याकामी तक्रार वा हरकत करणार नाही. वरील वर्णनाची मिळकत लिहुन देणार यांनी #SELLINGAMOUNT रुपयांमध्ये मालकी व ताब्याच्या हक्कासह विक्री करुन मालकी आधारे मिळकत तदंगभूत वस्तुसहीत कायमची लिहुन घेणार यांच्या ताब्यात दिली आहे. रक्कमेचा भरणा खालील दिलेल्या तपाशिल प्रमाणे लिहुन देणार यांना मिळाला आहे.

6) Text Four:-

वरीलप्रमाणे सदरच्या मिळकतीच्या मोबदल्यापोटी संपुर्ण #SELLINGAMOUNT मिळाली त्याची वेगळी पावती देण्याची गरज नाही. रकमेबाबत कोणताही वाद किंवा तक्रार राहीलेली नाही. यदाकदाचित सदर खरेदीखतामध्ये काही चुक/चुका झाल्याचे आढळल्यास दुरुस्ती लेख/चुक दुरुस्ती पत्राचा दस्त लिहुन देणार हे लिहुन घेणार यांना विना विलंब विनामोबदला विनातक्रार लिहुन व नोंदवुन देतील. सदरील दस्तऐवजास लागणारे कागदपत्रे लिहुन देणार यांनी स्वत:संबंधित कार्यालयातून आणलेले आहेत. व जर सदर दस्तातील

माहीती चुक व खोटी आढ़ळुन आल्यास नोंदणी अधिनियम 1908 चे कलम 82 नुसार लिहुन देणार शिक्षेस पात्र राहील.

वर वर्णन केलेल्या मिळकती संबंधी भविष्यात काही वाद उदभवल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी लिहुन देणार यांच्यावर राहील.अधिकारी किंवा संगणक टायपींग करणार यांच्यावर राहणार नाही. सदरील खरेदीखताचा मजकुर कॉम्प्युटर प्रिंट केला असुन लिहुन घेणार व लिहुन देणार यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे प्रिंट केला आहे. जो लिहुन घेणार व लिहुन देणार या दोघांनीही वाचुन,समजुन घेवुन खालील साक्षीदारासमक्ष या खरेदीखतावर सह्या केल्या आहेत. करीता हे खरेदीखत खरे व बरोबर आहे असे मान्य केले आहे.

7) Text Five:-

या लेखाआधारे लिहुन घेणार हे विक्री मिळकतीचे पुर्णपणे मालक व कब्जेदार झाले असुन या लेखा आधारे राजस्व कागदोपत्री 7/12 वर फेर अमल करुन घेऊ शकता सबब हे कायम खरेदीखत लिहुन देणार यांनी राजीखुशीने व स्वयसंतोषाने अक्कल हुशारीने समजून उमजून वाचून घेवुन कोणाच्याही दबावाला बळी न पडता, कोणत्याही प्रकारची नशापाणी न करता लिहून व नोंदवून दिले जे खरे व बरोबर आहे.

8) Text Six:-


साक्षीदार

आम्ही खाली सही करणार साक्षीदार असे नमुद करतो की,आम्ही सदर लिहून देणार व घेणार यांना पूर्णपणे ओळखतो तसेच सदरचा दस्ताऐवज आम्ही स्वता: वाचला असून/आम्हाला वाचून दाखवला असून नीट समजावून सांगीतला आहे तो आम्हास मान्य व कबुल आहे.सदरच दस्तऐवज वरील सर्व निष्पादक यांनी समजून उमजून कोणत्याही दडपणास बळी न पडता, पूर्णपणे शुध्दीवर असताना,राजीखुशीने व कोणत्याही प्रकारचा व्यसनाच्या अंमलाखाली न येता लिहून देणार घेणार यांनी आम्हास साक्षीदार समक्ष सह्या/अंगठे करुन त्यांचे स्वता:चे फोटो चिटकवले आहेत.त्यामुळे आणि सदरच्या सर्व घटना आमच्या समोर व आमच्या साक्षीने झालेल्या असलेने सर्व आम्हास मान्य व कबुल आहे.आम्ही देखील समजून-उमजून कोणत्याही दडपणाला बळी न पडता पूर्णपणे शुध्दीवर असताना साक्षीदार म्हणून आमच्याच सह्या व अंगठे केले असून आमचे फोटो चिटकवले आहेत.त्याच प्रमाणे ओळखपत्राच्या सत्यप्रती दस्तासोबत जोडल्या आहेत.सदर व्यवहाराचे साक्षीस आम्ही जबाबदार व बांधील आहोत.

Google Crome वर फॉट चेंज कसा करावा.

1) Google Crome च्या सेटींगमध्ये जाणे व Font सर्च करणे.


असे सर्च होईल.व Customize Font वर क्लीक करणे. त्यानंतर




Sans-Serif Font मध्ये आपल्याला पाहीजे तो फॉट जेंज करणे.


**पेज सेटींग.**

पेज सेटींग मध्ये प्रिंटर सेलेक्ट करुन खाली मार्जीनवर जाउन कस्टम वर क्लीक करणे व मार्जीन देणे.





## Mozilla Font Setting

**Mozilla** च्या सेटींगमध्ये जाणे व Font सर्च करणे




Advanced वर क्लीक करणे व

Sans-Serif वर क्लीक करुण ओके करणे



## प्रॉपट्री चे वर्णन प्लॉट/मिळकत विक्री

**मौजे- परतुर येथील नगर परीषद हद्दीतील सर्वे नं. 148/1 नवा एकुण क्षेत्र 0 हे 54 आर पो ख 00 आर आकार 0 रु 85 पैसे यामध्ये युवराज पार्क मधील अकृषीक झालेले प्लॉट क्र 1 ज्याची लांबी पुर्व पश्चिम 0 मीटर व रुंदी दक्षीण उत्तर 0 मीटर एकुण क्षेत्र 3268.51 चौमी आहे खुला प्लॉट आम्ही तुम्हास आमच्या संपुर्ण मालकीहक्कासह व ताब्यासह कायमस्वरुपी विक्री केला आहे.**

**सदरील प्लॉटचा एन.ए.झालेला असुन नं.1982/LND.NAP.CR.3 जिल्हाधिकारी कार्यालय जालना.-43 दिनांक सप्टेंबर 1983.मंजुर रेखांकन पत्र क्र LYT/Partur दिनांक 10/06/1982 नगर रचनाकार परभणी.**

## शेत जमीन विक्री

मौजे दैठणा बु,ता. परतूर येथील गट नं. 22 ज्याचे क्षेत्र 5 हे 75 आर पो. ख. 0 हे 47 आर आकार 23 रु 20 पैसे यात माझी 1 हे 88 आर पैकी 0 हे 88 आर विहीरीच्या पाण्याच्या 50 पैसे हिस्यासह हंगामी बागायत **शेत जमीन मी तुम्हास माझ्या संपुर्ण मालकीहक्कासह व ताब्यासह कायमस्वरुपी विक्री केली आहे.**

## बक्षीसपत्र

मौजे-आंबा ता.परतुर,जि.जालना येथील गट नं.236 चे एकुण क्षेत्रफळ 0 हेक्टर 83 आर आकार 4 रुपये 55 पैसे पोट खराब 0 हेक्टर 03 आर या पैकी माझ्या मालकी,कब्जाचे व हिस्याचे पोट खराबसह क्षेत्रफळ 0 हेक्टर 86 आर जिरायत शेत जमीन मी माझा मुलगा नामे महादेव वामन मावकर मयत असुन त्याची पत्नी नामे शारदा महादेव मावकर यांना म्हणजे माझ्या मरण पावलेल्या मुलाची पत्नी (सुन) यांना विनामोबदला मालकीहक्कासह कायमस्वरुपी बक्षिस दिली आहे.

## हक्कसोडपत्र

**मौजे- बाबई येथील गट नं.** 29 **एकूण क्षेत्र** 1 **हे** 85 **आर आकार** 7 **रु.** 70 **पैसे** पोटखराब 03 आर **पैकी लिहून देणार व लिहून घेणार यांचे एकत्रित मालकीचे क्षेत्र** 0 **हेक्टर** 0.94 **आर व मौजे- बाबई येथील गट नं.** 31 **एकूण क्षेत्र** 1 **हे** 86 **आर आकार** 7 **रु.** 75 **पैसे** पोटखराब 03 आर **पैकी लिहून देणार व लिहून घेणार यांचे एकत्रित मालकीचे क्षेत्र** 0 **हेक्टर** 0.94 **आर व मौजे- बाबई येथील गट नं.** 33 **एकूण क्षेत्र** 1 **हे** 18 **आर आकार** 4 **रु.** 90 **पैसे** पोटखराब 00 आर **पैकी लिहून देणार व लिहून घेणार यांचे एकत्रित मालकीचे क्षेत्र** 0 **हेक्टर** 0.39 **आर असे तिनही गटाचे मिळुन एकुण क्षेत्रफळ** 2 **हे** 27 **आर** लिहून घेणार यांना प्रत्येकी 1/8 असा अविभ**क्त** हिस्सा प्राप्त झालेला असुन**,** सदर

मिळकतीची विल्हेवाट लावण्याचा हक्क व अधिक्कार लिहून देणार यांना प्राप्त **असुन आज रोजी हक्कसोडपत्र लिहुन घेणार यांच्या हक्कात लिहुन दिले आहे.**

2) **वर कलम** 1 **मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये लिहून देणार यांचे** 1/7 **अविभक्त हिश्याची मिळकत, प्रस्तुत विनामोबदला हक्कसोडपत्र** लिहुन दिले आहे.**व सदरील** मिळकत ही मुळतः **स.अयूब स.चाँद** यांचे मालकी हक्काची व ताबे वहिवाटीची होती तद्नंतर **कै. स.अयूब स.चाँद** यांचे दिनांक 04/04/2024 रोजी निधन झालेले असून, त्यांचे मृत्यूपश्चात यांच्या पत्नी नामे **शामीम अय्युब सय्यद** व मुले नामे **सद्दाम अय्युब सय्यद, व इलीयास अय्युब सय्यद** व मुली नामे **यास्मीन एजाज बागवान,नसरीन अय्युब सय्यद,आफरीन शाहेद बागवान,फरहाना सादीक बागवान व तबस्सुम मो.सिद्दीकी बागवान** असे कायदेशीर वारसदार असून, सदर कायदेशीर वारसांची वारस नोंद सदर मिळकतीच्या महसुल दप्तरी व 7/12 पत्रकी फेरफार क्र. 1438/2024 अन्वये करण्यात आलेली आहे.लिहून देणार क्र.2 **ते** 8 यांच्या लिहून घेणार ह्या आई असुन लिहुन देणार क्र 2 ते 8 हे लिहुन घेणार यांचे **मुले व मुली असुन लि.देणार क्र** 2 **ते** 8 **हे सख्ये बहीन भाऊ** आहेत.

## गहाण मालमत्तेचे प्रत्यांतरणपत्र

**मौजे- परतुर येथील सर्वे नं.**131/3 **मधील नगर परीषद मालमत्ता क्र** 3717, 3718, 3719, 3720, 3721 **चे एकुण क्षेत्र** 593.14 **चौमी जागा चोलामंडलम इन्वेसमेंट ॲन्ड फायनान्स कंपनी ली.शाखा औरंगाबाद यांच्या हक्कात गहाण ठेवुन गहाणखताचा दस्त क्र** 148/2023 **नुसार कर्ज रक्कम रुपये** 88,00,000/- **(अक्षरी- अठ्यांशी लाख रुपये फक्त )घेतले होते. ते कर्ज घेवुन चोलामंडलम इन्वेसमेंट ॲन्ड फायनान्स कंपनी ली.शाखा औरंगाबाद यांच्या हक्कात गहाणखत नोंदणी करुन दिले होते. व फायनान्सच्या नियमाप्रमाणे व्याजासह कर्ज रक्कम परतफेड केली असुन आज रोजी लिहुन घेणार यांच्या हक्कात वरील वर्णन केलेल्या गहाण मालमत्तेचे प्रत्यांतरणपत्र लिहुन दिले आहे.**

## गहाणखत

**मौजे- सातोना खु ता. परतुर जि.जालना येथील ग्रामपंचायत हद्दीतील मालमत्ता क्र** 891 **क्षेत्रफळ** 25 X 50 **फुट एकुण** 1250 **चौ.फुट म्हणजे क्षेत्रफळ** 116.17 **चौ मीटर जागा गहाण दिली आहे .**

**गहाणखत लिहुन देणार यांना रुपये** 70000/-**(अक्षरी सत्तर हजार रुपये फक्त) चे कर्ज यश अर्बन को आपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी लि.परतुर ता.परतुर जि.जालना शाखा सातोना खु चा प्रस्ताव संचालक मंडळ सभा दि.** 05/06/2024 **रोजी च्या ठराव क्र** 2 **नुसार मंजुर करण्यात आलेले आहे. या कर्जाची मुदत कायम असुन मंजुर कर्जाचे**

व्याजदर 16% राहील. व दंड व्याज 2 % असून कर्जाची मुदत 5 वर्ष (60 महीने) करिता व कर्जाचा हप्ता हा 17023/- रु असून ते मला मान्य आहे.

## सर्वअधिकारपत्र

मौजे नागापुर ता.परतुर जि.जालना येथील गट/सर्वे नं 21/1 चे एकुण क्षेत्रफळ 6 हेक्टर 32 आर आकार 29 रु 80 पैसे पोट खराब 0 हेक्टर 05 आर या पैकी माझ्या मालकी हिस्याचे क्षेत्रफळ 1 हेक्टर 58 आर पैकी 0 हेक्टर 12 आर जमीन निम्न दुधना प्रकल्पासाठी फेरफार क्र 201 नुसार संपादीत झालेली आहे सदरील जमीन संपादीत नसुन ती जमीन परत घेण्यासाठी व परत घेवुन विक्री करीता लिहुन घेणार राजेश प्रभाकरराव शेवलीकर हे अशोक प्रभाकरराव शेवलीकर,महेश प्रभाकरराव शेवलीकर,अल्का अरुण जोशी व नीता सुनील दुर्गपुरोहीत यांचे सख्खे भाऊ आहेत. व मंगल दिलीप शेवलीकर ह्या आमचे मयत सख्खे भाऊ दिलीप प्रभाकरराव शेवलीकर यांच्या पत्नी असुन लिहुन घेणार यांच्या भावजई आहेत. असे आमचे रक्ताचे नाते असुन आम्ही नामे राजेश प्रभाकरराव शेवलीकर यांना कुलमुखत्यार म्हणुन नेमीत आहे.

## विशेष अधिकारपत्र

मौजे- वाटुर,ता.परतुर,जि.जालना येथील गट क्र 172 व 173 पैकी गट क्र 172 मधील मुक्ताई नगर मधील भुखंड क्र 17 ते 33 चे क्षेत्रफळ एकुण 2821.44 चौमी करीता लिहुन घेणार नेहा सुभाष हजारे यांची नेमणुक केली आहे.